



# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३२७ वा | बुधवार दि २५ मार्च २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# बोगस दिव्यांगांवर सीईओंचा हातोडा!

## यह तो झाकी है पुरा पिक्चर अभि बाकी है १५ कर्मचाऱ्यांना थेट निलंबनाचा दणका

## दिव्यांग प्रकरणात दोषी असलेल्या शासकीय अधिकारी व कर्मचारी यांची मिळालेल्या माहिती नुसार नावे आम्ही प्रकाशित करीत आहोत...

श्री.गजानन गुलाबराव बेलोडे ग्रा.प.अ.

श्री.भगवान श्रीराम पवार स.शिक्षक

श्री.राजू पांडुरंग सोळंके स. शिक्षक

श्री. विकास पांडुरंग बाहेकर स. शिक्षक

संनिता अनुप बाहेकर स. शिक्षक

श्री.सुभाष प्रल्हाद अंभेरे स.शिक्षक

श्रीमती नंदा द्रेवींसिंग हाडे स. शिक्षक

श्री.रंगनाथ कल्याणराव गावडे स. शिक्षक

परमेश्वर उत्तम शेळके स. शिक्षक

श्री.मनोहर समाधान जुमडे स. शिक्षक

खान अनिस खान इस्माईल स. शिक्षक

कु. अंबिका महाद्रेव अढाव स. शिक्षक

श्री गणेश विश्वनाथ कोथळकर स. शिक्षक

श्री गजानन सखाराम सारखे परिचर

श्री संदीप पांडुरंग चव्हाण ग्रा.पं.अ

## बोगस दिव्यांग प्रकरणात सर्व प्रथम कारवाई झालेल्यांची नावे दैनिक जनसंचलनकडे...

जनसंचलन/बुलढाणा

**जितेंद्र कायस्थ**




जिल्हा परिषदेत बोगस दिव्यांगांच्या नावाखाली सुरू असलेल्या गैरप्रकारांवर अखेर कठोर कारवाईस सुरुवात झाली असून मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी १२ सहायक शिक्षक,१ग्रामसेवक ग्रा. सेवक अधिकारी आणि १ परिचर अशा एकूण १५ कर्मचाऱ्यांना थेट निलंबित करत प्रशासनात खळबळ उडवली आहे.युडीआयडी कार्ड नसतांनाही विविध शासकीय सवलती उचलणाऱ्या कर्मचाऱ्यांवर ही कारवाई करण्यात आली. दिव्यांगांच्या सुरू झासलेल्या पडताळणी मोहिमे दरम्यान जिल्हा परिषद स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या विशेष समितीने ५५ संशयित कर्मचाऱ्यांची यादी तयार केली होती.या सर्वांना १२ मार्च रोजी मूळ कागदपत्रांसह हजर राहण्याचे आदेश देण्यात आले होते.मात्र वारंवार संधी देऊनही १५ कर्मचारी तपासणीसाठी गैरहजर राहिले.यामुळे त्यांच्या दिव्यंगत्वावर संशय अधिक गडद झाला आणि अखेर सीईओंनी निलंबनाचा निर्णय घेतला. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून शासनाच्या सवलतींचा गैरवापर करणाऱ्यांवर कुठलीही दया दाखवली जाणार नाही,असा स्पष्ट संदेश प्रशासनाने दिला आहे. काही कर्मचाऱ्यांकडे युडीआयडी कार्डच नव्हते, तर काहींच्या प्रमाणपत्रांवर गंभीर शंका उपस्थित झाल्या. या कारवाईमुळे जिल्ह्यातील इतर शासकीय कर्मचाऱ्यांमध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले असून ङ्गबोगसफ मार्गाने लाभ घेणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांना संरक्षण आणि गैरप्रकार करणाऱ्यांना शिक्षा, हा खरात यांचा स्पष्ट प्रशासनिक फॉर्म्युला पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. दरम्यान, सुरुवात झालेल्या या कारवाईनंतर जिल्हाभरात जोरदार चर्चा रंगली असून पुढील काळात आणखी मोठ्या कारवाया होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.


बोगस दिव्यांग / अस्तिव्यंग प्रमाणपत्र देणार व घेणार यांची उच्चस्तरीय चौकशी होणे फार गरजेचे असून सिटी न्यूजकडे सूत्रांच्या माहिती नुसार ही कारवाईची सुरुवात असून अजून बरीच शेकडोंच्या संख्येत बोगस दिव्यांग / अस्तिव्यंग प्रमाणपत्र धारक आहेत व त्यांनी शासकीय लाभांचा पुरेपूर लाभ घेतला दुसरे ज्या दिव्यांग धारकांनी मागील काळात बोगस प्रमाणपत्र बुलडाणा जिल्हा सामान्य रुग्णालयातून अर्थपूर्ण नियमबाह्य? देण्यात व घेण्यात आली त्या नावांचा ही फार मोठा गौप्यस्फोट आम्ही पुराव्यानिशी करणार आहोत आम्ही जो पर्यंत खऱ्या दिव्यांगांना न्याय मिळवून देत नाहीत तोपर्यंत आमचा पाठपुरावा सतत सुरू राहणार आहे

क्रमश:

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# वाढता उष्मा आणि किडनीचे आरोग्य



गंबर धनावडे हे सत्तरीतील निवृत्त पोस्टमास्तर. लालबागला मुलांसोबत राहतात. संधिवाताशी संबंधित किडनी विकारासाठी गेल्या तीन वर्षांपासून उपचारासाठी येतात. गेली दोन वर्षे त्यांची तब्येत स्थिर आहे. आजारपणामुळे पूर्वीसारखं नेहमी गावी जाणं होत नाही, अशी खंत ते दरवेळी बोलून दाखवतात. होळीनिमित्त कोकणातील त्यांच्या मूळ गावी देवीची मोठी जत्रा असते. दोन आठवड्यांपूर्वी जवळपास तीन वर्षांनी ते गावी गेले, सर्व आप्तेष्टाच्या गाठीभेटी झाल्या, देवीची जत्रा झाली. चौथ्या दिवशी त्यांच्या मुलाचा फोन आला की बाबांची तब्येत अचानक बिघडलीय, बेडमध्ये हालचाल करण्याइतकेही त्राण शरीरात नाहीत, आम्ही लगेच मुंबईला निघतोय. दोन मिलिग्रॅमच्या आसपास स्थिर असलेला किडनीचे काम दर्शवणारा क्रियाटिनिन हा घटक साडेचारवर गेला होता. शिवाय इतरही अनेक पॅरामीटर्स गडबड होते. तीन दिवस आयसीयूमध्ये उपचार घेऊन ते बरे झाले. सर्व पूर्वपातळीवर आलं असलं तरी, सर्व कुटुंबाच्या सुट्टीचा बेत असा लवकर आटोपता घ्यावा लागला, याची सल मात्र राहिली. केईएम रुग्णालयात किडनी प्रत्यारोपणासाठी देशभरातून रुग्ण येतात. प्रत्यारोपणानंतरही दर दोन-तीन महिन्यांनी ते नियमित तपासणीसाठी येत असतात. दोन वर्षांपूर्वी किडनी प्रत्यारोपण झालेल्या व जळगावला राहणाऱ्या विकासचा फोन आला, की अचानक त्याला भयंकर थकवा आला आहे, रक्तदाब कमी झालाय, शिवाय लघवीचं प्रमाणही कमी झालंय. तिथल्या फिजिशियनकडे प्राथमिक उपचार घेऊन तो तातडीने मुंबईला आला आणि केईएममध्ये किडनी ट्रान्सप्लांट आयसीयूमध्ये दाखल झाला. त्याच्या प्रत्यारोपण केलेल्या किडनीचं कामही कमी झालेलं आढळलं. ट्रान्सप्लांट होऊन दहाहून अधिक वर्षं झाली होती, सर्व सुरळीत चाललेलं असताना अचानक गुंतागुंत का निर्माण झाली, हे आम्ही शोधू पाहत होतो. शरीरातील पाणी अचानक कमी झाल्याची म्हणजेच डिहायड्रेशनची अनेक लक्षणं आढळली. कसलाही रक्तस्त्राव नाही, जंतुसंसर्ग नाही, जुलाब-उलट्या नाहीत. मग इतकं गंभीर डिहायड्रेशन होऊन किडनीला इजा व्हायचं कारण काय? जळगावजवळ एका गावात रस्त्याच्या कडेला विकासचं किराणा मालाचं दुकान होतं. हे दुकान पक्क्या बांधकामाचं नव्हतं. त्याच्या भिंती आणि छत ॲल्युमिनिअमच्या पत्र्याचं होत. गेले काही दिवस जळगाव आणि परिसरात उष्णतेची लाट आली होती. विकासला नेहमीचं कामं करताना प्रचंड थकवा जाणवत होता, आणि दोन तीन दिवसांनी दवाखान्यात दाखल व्हावं लागलं होत. वातावरणातील उष्णतेचा परिणाम होऊन किडनीचं काम करणं अचानक कमी झालं होतं. विकासच्या केसनंतर आमच्या पुढील एका वर्षात किडनी ट्रान्सप्लांट झालेल्या व विविध भागांतून येणाऱ्या नऊ रुग्णांना अशा प्रकारे वातावरणातील उष्णतेमुळे किडनीला इजा झाल्याचं निदर्शनास आलं. उन्हाळ्यात सुट्ट्यांसाठी गावी गेलेफ, ङ्गउन्हात प्रवास केलाफ, ङ्गशेतात काम केलंफ ही व यांसारखी ङ्गहीट एक्सपोजर आम्हाला आढळली. किडनी ट्रान्सप्लांट झालेल्या रुग्णांमध्ये दिसणाऱ्या उष्म्याशी संबंधित आजाराचं संशोधन गेल्या वर्षी आमच्या पथकानं प्रकाशित केलं. वरील सर्व उदाहरणांमध्ये वातावरणातील उष्म्यामुळे किडनीला इजा झाली होती, त्याला ङ्गहीट रिलेटेड इलनेसफ किंवा ङ्गउष्म्याशी निगडित आजारफ असं म्हणतात. उष्म्याशी संबंधित आजाराची तीव्रता ङ्गसौम्य थकवाफ ते गंभीर ङ्गहिट स्ट्रोकफ अशी काहीही असू शकते. लहान मुलं, वृद्ध, तसेच मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, किडनीविकार असलेल्या व्यक्तींमध्ये हा आजार व्हायची शक्यता व तीव्रताही अधिक. अशा सर्वांनी त्यामुळेच उन्हाळ्यात काळजी घ्यायला हवी. ङ्गहीट वेव्हफच्या काळात शक्यतो घराबाहेर न पडणं, छत्री, टोपी, हात पाय झाकले जातील असे सुती कपडे परिधान करणं, घराबाहेर पडल्यास पुरेसं स्वच्छ पाणी सोबत बाळगणं, द्रवपदार्थांचं मुबलक सेवन, रक्तदाब, वजन ह्यावर लक्ष ठेवणं व कसलीही शारीरिक लक्षणे आढळली तर त्याकडे दुर्लक्ष न करता वैद्यकीय सल्ला घेणं महत्त्वाचं. मध्य अमेरिकेतील अनेक देशांत तर उष्म्यामुळे होणारा किडनी विकार- मेजोअमेरिकन नेफ्रोपॅथी- हा मोठा व गंभीर प्रश्न बनला आहे. तिथे उसाच्या शेतांमध्ये काम करणाऱ्या मजुरांमध्ये उष्मा आणि त्याचा परिणाम म्हणून कामादरम्यान वारंवार होणारं डिहायड्रेशन हे किडनीच्या आजाराचं मुख्य कारण ठरत आहे. अशाच प्रकारचा आजार उत्तर महाराष्ट्रातील गावांमधील शेतकरी व शेतमजुरांतही आढळतो. अशा ठिकाणी कामाच्या मर्यादित वेळा, पिण्याच्या पाण्याचा मुबलक पुरवठा, कामादरम्यान सक्तीची विश्रांती अशा उपाययोजनांची तातडीनं गरज आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# 'जिन्हें हाथ पकडकर चलना था, हैरत है, वे बात पकडकर बैठ गए', ठाकरेंच्या निरोप समारंभाला फडणवीसांची शायरी

**मुंबई/वृत्तसंस्था :** "महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि स्वर्गीय हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे सुपुत्र उद्धव ठाकरे यांचा आज निरोप समारंभ आहे. खरं राजकारणात मतभेद असतात, वेगवेगळ्या भूमिका असतात, कधी आपण सोबत असतो, कधी संघर्ष करतो. पण या पलिकडचं देखील एक नातं राजकारणात असतं. ते नातं असतं सहप्रवासाचं. उद्धव ठाकरे यांच्यासोबतचा प्रवास हा अनेक वर्षांचा आहे. आम्ही अनेक वर्ष सहप्रवासी राहिलेलो आहोत. आम्हाला अनेक चांगल्या गोष्टी समाजाकरता, राज्याकरता एकत्रित करण्याची संधी आम्हाला प्राप्त झाली", असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपल्या भाषणात म्हणाले. उद्धव ठाकरेंचा स्वभाव आणि व्यक्तीमत्व यामध्ये राजकारण थोडं कमी आहे. मला असं वाटतं की, त्यांचा स्वभाव राजकारणी नाही. त्यामुळेच ते अनेकदा जे निर्णय घेतात, त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारची परिस्थिती उद्भवते. पण हा एक गुण मला असं वाटतं की, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचाही होता की, एकदा ठरवलं की निर्णय घेऊन टाकायचा. तशा पद्धतीचा स्वभाव उद्धवजींचा आहे", असं देवेंद्र फडणवीस म्हणाले."उद्धवजी तसे छायाचित्रकार आहेत, अतिशय निष्णांत तज्ज्ञ, सुप्रसिद्ध छायाचित्रकार आहेत. महाराष्ट्राच्या विविध छटा या उद्धव ठाकरेंनी आपल्या कॅमेऱ्याच्या माध्यमातून चित्रित केल्या आहेत. गडकिल्ले, निसर्ग, वारकरी परंपरा, हे सगळं त्यांनी त्यांच्या कॅमेऱ्यात कैद केलं. हे सगळे फोटोग्राफ पाहिल्यानंतर त्यापाठीमागील त्यांचं संवेदनशील मन पाहायला मिळतं. म्हणूनच महाराष्ट्र देशा आणि पहावा विठ्ठल ही त्यांची कामे केवळ छायाचित्र नाहीत तर आपल्या




संस्कृतीची जपणूक या माध्यमातून करण्याचे काम उद्धव ठाकरेंनी केलं आहे. हे करण्याकरता त्यांनी खूप कष्ट देखील घेतले आहेत. वारीचे छायाचित्रण केलं तेव्हा हेलिकॉप्टरचा दरवाजा उघडून त्यांनी छायाछित्रण केलं."राजकारणामध्ये आल्यानंतरदेखील उद्धव ठाकरे पक्षप्रमुख झाले. यानंतर जो काही संघर्ष होता, बराच काळ आम्ही सोबत त्या संघर्षातून पुढे गेलो. माझी आणि त्यांची जवळीक 2010 नंतर आली, 2014 नंतर अधिक आली. पण मला असं वाटतं की, या सगळ्या काळात मैत्रीची भावना आमच्यात तयार झाली. मी असं म्हणणार नाही की, आज ती नाहीत. शेवटी त्यांच्या राजकीय भूमिका आहेत आणि आमच्या राजकीय भूमिका आहेत, त्या राजकीय भूमिका वेगळ्या झाल्या."एक गोष्ट मला या निमित्ताने निश्चितपणे सांगायची आहे, राजकारणात काम करत असताना अनेकवेळा बघितलं की, एखादा निर्णय घेत असताना त्याच्या परिणामांची चिंता केली नाही.

एक गुण आहे, जो हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंनी एक पायंडा पाडला की, सामान्यातील सामान्य माणसाला ज्याला राजकीय चेहरा नाही, अशा व्यक्तीला देखील राजकीय चेहरा देणं, त्यातून राजकीय नेतृत्व उभं करणं हा गुण निश्चित शिकण्यासारखा आहे. बाळासाहेबांनी तो गुण आपल्या सर्वांना दिला. उद्धव ठाकरेंनी तो गुण जोपसला.""पु.ल. देशपांडेंना कोट्याधीश म्हणतात, पण त्यांच्यानंतर कुणाला ही कोट्याधीश उपाधी द्याची असेल तर मी उद्धव ठाकरेंना देईन. त्यांच्या बोलण्यात अनेकदा मिश्किलपणा असतो. ते सहजतेने बोलताना दिसतात. अनेकदा ते भिडताना दिसतात, खूप जोरदार प्रतिवाद करताना दिसतात. पण त्यांचा मूळ स्वभाव तो नाही. त्यांचा मूळ स्वभाव हा शांत, संयमी आहे, संबंध ठेवायचा मूळ स्वभाव आहे. आपल्याला राजकारणात वेगवेगळ्या प्रकारचा आवेश आणावा लागतो. त्याप्रमाणे तो आवेश देखील आणताना आपण पाहतो. पण या सगळ्या परिस्थितीत मला एक गोष्ट निश्चितपणे वाटते. आता या सभागृहात ते सहा वर्षे होते. त्यांनी निर्णय घेतला तर."

## दरवाजा लावताना हात अडकल्याने बोटाला जखम; व्हायरल फोटोंबाबत तटकरेंचा खुलासा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भोंदूबाबा अशोक खरात याचे महिलांवरील अत्याचाराबाबतचे प्रकरण समोर आल्यानंतर विविध राजकीय नेत्यांचीही चांगलीच अडचण झाली आहे. या प्रकरणात राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना आपलं पद गमवावं लागल्यानंतर राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे यांच्यावरही टीकेची झोड उठली आहे. रुपाली चाकणकर यांच्याप्रमाणे सुनील तटकरे यांनीही कर्मकांड करताना हाताचे बोट कापल्याचा दावा करत त्यांचे काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल केले जात आहेत. या फोटोंबाबत आज नवी दिल्ली इथं पत्रकार परिषद घेत सुनील तटकरे यांनी स्पष्टीकरण दिलं असून आरोप करणाऱ्यांना फटकारलं आहे.2024 च्या लोकसभा निवडणुकीचा अर्ज दाखल करण्याच्या दोन दिवस आधीची ही घटना आहे. मी अलिबाग इथं माजी आमदारांच्या समाधीचं दर्शन घ्यायला गेलो असताना ॲड प्रवीण ठाकूर हे मला भेटले. ते माझे प्रतिस्पर्धी उमेदवार अनंत गिते यांचे काम करत होते. मात्र आमचे कौटुंबिक संबंध असल्याने ही भेट झाली. त्यांना भेटून निघत असताना त्यांना दरवाजा



लावला आणि यावेळी हात अडकल्याने माझ्या अंगठ्याला जखम झाली. मला टाकेही पडले होते. त्यानंतर मी दिल्लीत आलो, तेव्हा तुम्हीही ती जखमी पाहिली असेल," असं म्हणत सुनील तटकरे यांनी आपल्यावरील आरोपांना उत्तर दिलं आहे.माझी श्रद्धा जरूर आहे, पण मी अंधश्रद्ध नाही. गणेशोत्सव असेल किंवा इतर वेळी जेव्हा मी मंदिराना भेटी देत असतो, तेव्हा पूजा होत असते. मी 40 वर्षांपासून राजकारणात आहे. 2019 ची लोकसभा निवडणुकीत मी महाविकास आघाडीकडून आणि 2024 ची लोकसभा निवडणूक मी एनडीएकडून जिंकलो आहे. माझ्या जिल्ह्यातील लोकांना मी कसा आहे, ते माहीत आहे. त्यामुळे आरोप करणाऱ्यांना वारंवार उत्तरे देण्याची आवश्यकता नाही," अशा शब्दांत तटकरे यांनी आपली भूमिका मांडली आहे.

## एकनाथ शिंदेंनी साताऱ्याचा वचपा नगरमध्ये काढला?

**अहिल्यानगर/वृत्तसंस्था :** कर्जत शहराच्या नगराध्यक्ष रोहिणी घुले यांचे पती सचिन घुले आणि जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रवीण घुले यांनी अचानक भाजपला रामराम ठोकत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. मुंबईत झालेल्या या प्रवेश सोहळ्याने कर्जतच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. घुले यांचा शिवसेना प्रवेश हा भाजप नेते आणि विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांना हा थेट धक्का मानला जात आहे. घुले यांनी धनुष्यबाण हाती घेताच स्थानिक राजकारणात भूकंप झाल्याची चर्चा रंगत आहे. कारण, कर्जत नगरपंचायतीतील सत्तांतर घडवण्यात घुले यांचा मोठा वाटा होता. विशेष म्हणजे, रोहित पवार यांच्या गटाच्या प्रभावाखालील सत्तासमीकरणात घुले हे किंगमेकर मानले जात होते.प्रवीण घुले आणि सचिन घुले यांच्या राजकीय निर्णयाची चाहूल सोमवारी सायंकाळपासूनच लागली होती. समर्थकांनी अचानक सोशल मीडियावर 'जय महाराष्ट्र'चे स्टेटस ठेवत बदलाचे संकेत दिले व काही तासांतच स्वत: प्रवीण घुले मुंबईत पोहोचले आणि त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा भगवा खांद्यावर घेतला. त्यामुळे भाजपमध्ये एकच खळबळ उडाली.

## साताऱ्यात पोलीस अधीक्षकांच्या निलंबनाचे निर्देश, भाजपला शेवटपर्यंत थांगपत्ता नव्हता

**सातारा/वृत्तसंस्था :** सातारा जिल्हा पोलिस अधीक्षकांच्या निलंबनाच्या निर्देशांमागे पडद्याआडून घडलेल्या गोष्टींचा भाजपला पत्ताच नव्हता, अशी माहिती आता पुढे आली आहे. राज्यातील भाजप नेतृत्वाकडून याबाबत नाराजी व्यक्त करण्यात आल्याचे समजते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेतली आहे. विधान परिषदेत सातारा पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याचे निर्देश उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्याकडून देण्यात आले. त्यावर सभागृहात उपस्थित असलेले वनमंत्री गणेश नाईक तसेच उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सरकारकडून या कारवाईला मान्यताही दिली. मात्र, हे सर्व अशा घाईघाईत झाले की याचा शेवटपर्यंत भाजपला थांगपत्ता लागला नाही.सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीवरून भाजप आणि शिवसेना-राष्ट्रवादी या तिन्ही पक्षात मतमतांतरे होती. अशावेळी बहुमत नसतानाही भाजपने अध्यक्षपदाच्या निवडणुकीत बाजी मारली. मात्र, या निवडणुकीदरम्यान पोलिसांसोबत झालेल्या झटापटीत मंत्री शंभुराज देसाई यांना दुखापत झाली. त्याचसोबत मंत्री मकरंद पाटील



यांच्यासोबतही पोलिसांची झटापट झाली. यावरून विधान परिषदेत शिवसेना आणि राष्ट्रवादीचे आमदार सभागृहात आक्रमक झाले. उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी सातारा जिल्हा पोलीस प्रमुखांच्या निलंबनाचे निर्देश दिले. सभागृहात उदय सामंत आणि गणेश नाईक हे दोन्ही मंत्री उपस्थित असल्याने त्यांना सरकार म्हणून या कारवाईचे समर्थनही केले. मात्र या निलंबनाबाबतची माहिती भाजपला उशिरा कळाल्याचे समजते. साताऱ्यामध्ये जिल्हाध्यक्ष भाजपचा बसल्याने पोलिसांच्या कारवाईला पक्षाकडून अप्रत्यक्षरित्या समर्थन असल्याचे समजते. अशा परिस्थितीत पोलिसांवरच अशाप्रकारची कारवाई झाल्याने भाजपलाही आश्चर्याचा धक्का बसला आहे.ही कारवाई आता मागे घेण्यासाठी पडद्यामागून हालचाली सुरू असल्याचे समजते.

# लोकसभेत महिला आरक्षणाची नांदी, मतदारसंघांची संख्या थेट ८१६ वर पोहोचणार, महाराष्ट्रातूनही ४८ ऐवजी ७२ खासदार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** चार राज्यांमधील विधानसभा निवडणुकांसाठीचा प्रचार जोर धरत असतानाच लोकसभा मतदारसंघांची फेररचना करण्याच्या हालचाली सुरु आहेत. २०२९ ची लोकसभा आणि त्यानंतर होणाऱ्या विधानसभा निवडणुकांमध्ये महिलांना एक तृतीयांश जागांवर आरक्षण लागू करण्याच्या उद्देशाने घटनादुरुस्त्यांसह किमान दोन विधेयकं संसदेच्या चालू अधिवेशनात मांडण्याचा मोदी सरकारचा विचार आहे. या निर्णयामुळे देशाचं राजकीय चित्रच बदलण्याची चिन्हं आहेत. सोबतच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'महिला सक्षमीकरण' या अजेंड्यावरही बळकट मोहोर उमटण्याची शक्यता आहे.केंद्र सरकारच्या योजनेनुसार कार्यवाही झाली, तर लोकसभेतील जागांची संख्या सध्याच्या ५४३ वरुन ५० टक्क्यांनी वाढून ८१६ पर्यंत पोहोचेल. या वाढीव २७३ जागा केवळ महिलांसाठी राखीव ठेवल्या जातील. जेणेकरुन जेव्हा ही नवीन रचना अंमलात



येईल, तेव्हा सध्याची राजकीय समीकरणं आणि पुरुषांचं प्रमाण प्रचंड असलेल्या विद्यमान खासदारांना अचानक बाजूला सारलं जाणार नाही. त्यानुसार बहुमताचा आकडा ४०९ वर पोहोचेल. तर महाराष्ट्रातील जागाही ४८ वरुन ७२ वर पोहोचतील.गेल्या पाच दशकांहून अधिक काळात प्रथमच लोकसभेची सदस्यसंख्या वाढणार आहे. राज्यसभा आणि राज्यांमधील विधान परिषदांच्या सदस्यसंख्येवर मात्र याचा कोणताही परिणाम होणार नाही.किमान दोन विधेयके मांडली जातील—त्यापैकी एक मतदारसंघ पुनर्रचनेशी (delimitation) संबंधित असेल, तर दुसरे संविधानातील दुरुस्तीसाठीचे असेल.

या दोन्ही विधेयकांच्या मंजुरीसाठी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये दोन तृतीयांश बहुमताची आवश्यकता असेल.सत्ताधारी एनडीएकडे हे विधेयक केवळ स्वतःच्या बळावर मंजूर करुन घेण्याइतपत संख्याबळ नसलं, तरी ४ एप्रिल रोजी संपणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान हे विधेयक मंजूर करुन घेण्यासाठी सरकार आग्रही असल्याचं दिसून येतं. तसं शक्य न झाल्यास केवळ महिला आरक्षणाच्या मुद्द्यासाठीच एक विशेष (अल्पकालीन) अधिवेशन बोलावण्याच्या पर्यायाचा विचारही सरकार करु शकतं.गृहमंत्री अमित शाह या दोन विधेयकांसाठी पाठिंबा मिळवण्याच्या प्रयत्नांचे नेतृत्व करत असून त्यांनी सोमवारी दोन बैठका घेतल्या. यापैकी पहिली बैठक विरोधी पक्षांसह एनडी किंवा इंडिया अशा कोणत्याही आघाडीशी संलग्न नसलेल्या प्रादेशिक पक्षांसोबत झाली; तर दुसरी बैठक भाजपच्या मित्रपक्षांसोबत पार पडली.२०२३ मध्ये मोदी सरकारने सादर केलेल्या 'महिला आरक्षण कायद्या'ने विधिमंडळांमध्ये महिला आरक्षण लागू करण्याची प्रक्रिया 'सीमांकना'शी जोडली होती. हे सीमांकन जनगणनेची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर केले जाणार असून जनगणनेचे काम आता लवकरच सुरु होणार आहे.३१ मार्च २०२९ नंतर होणाऱ्या निवडणुकांपासून हा आरक्षण कोटा लागू करण्यास सरकार उत्सुक आहे" असं या घडामोडींची माहिती असलेल्या एका व्यक्तीने सांगितल्याचं वृत्त दिलं आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ठाण्याच्या गडकरी रंगायतन नाट्यगृहात महिला कलाकारांच्या मेकअप रुममध्ये परवानगी न घेता कामगारांनी प्रवेश केल्याचा आरोप

**ठाणे :** ठाण्यात गडकरी रंगायतन नाट्यगृहात महिला कलाकारांची परवानगी न घेता मेकअप रुममध्ये दुरुस्तीसाठी कामगारांनी प्रवेश केल्याचा आरोप नाट्यनिर्मात्याने केला आहे. याबाबत नाट्यगृह प्रशासनाने हलगर्जीपणा केल्याचा आरोप करत निर्मात्याने पालिका प्रशासनावर टीकास्त्र सोडले आहे. तसेच या प्रकरणी ठाण्याच्या महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या निर्देशाने तातडीने नौपाडा पोलीस ठाण्यात संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अवघ्या सात महिन्यांपूर्वी दहा महिन्यांपासून अंतर्गत आणि बाह्य नूतनीकरण तसेच दुरुस्ती कामासाठी बंद ठेवलेल्या गडकरी रंगायतन नाट्यगृहाची वास्तू रसिक प्रेक्षकांसाठी खुली करण्यात आली. दहा दिवसांपूर्वी या नाट्यगृहात एका




प्रसिद्ध नाटकाचा प्रयोग सुरू होता. यावेळी महिला कलाकारांच्या मेकअप रूममधील प्रसाधनगृहात तीन व्यक्ती पूर्वपरवानगी न घेता शिरल्याचा आरोप नाटकाचे निर्माते राहुल भंडारे यांनी केला. यावेळी मेकअप रूममध्ये महिला कलाकार कपडे बदलत होत्या. त्यावेळी हा प्रकार त्यांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी आरडाओरड केली असता तिन्ही व्यक्तींनी येथून पळ काढला. हा प्रकार नाट्यगृहाचे व्यवस्थापक भारत गाडेगावकर यांच्या निदर्शनास आणून दिला असता त्यांनी सहकार्य न केल्याचा आरोप निर्माते भंडारे यांनी केला.संबंधित महिला कलाकाराने नौपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तसेच संबंधित प्रकाराबाबत कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने ठाण्याच्या महापौर शर्मिला पिंपळोलकर आणि आयुक्त सौरभ राव यांना याप्रश्नी निवेदन देत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. महापौर पिंपळोलकर यांच्या पाठपुराव्याने या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याचे भंडारे यांनी नमूद केले.गडकरी'च्या तळमजल्यावर नाट्य परिषदेचे सभागृह आहे. या सभागृहात लिकेज असल्याची तक्रार समोर आली होती. ही बाब ठेकेदाराला निदर्शनास आणून देताच संबंधित लिकेज पहिल्या मजल्यावरील महिला मेकअप रूमच्या स्वच्छतागृहातून असल्याचा अंदाज वर्तवण्यात येत होता.

या प्रकाराची गंभीर दखल घेत ठेकेदाराचे कर्मचारी लिकेजची पाहणी करत होते. त्यावेळी हा प्रकार घडल्याची शक्यता असून या प्रकारानंतर पोलिसांना सीसीटीव्ही फुटेज स्वाधीन केल्याची माहिती व्यवस्थापक गाडेगावकर यांनी केली. या प्रकरणी गुन्हा दाखल असून अधिक तपास सुरु असल्याचे नौपाडा पोलिसांनी सांगितले.

## पत्नी नांदायला येईना म्हणून स्कुटी पेटवली

**पुणे :** वारजे परिसरात कौटुंबिक वादातून आगळावेगळाच प्रकार घडला. त्यामुळे वारजे परिसरातील नागरिक मात्र हैराण झाले आहेत. झालं असं... दीड वर्षापासून सुरू असलेल्या पती-पत्नीतील वाद थेट दुचाकी जाळण्यापर्यंत पोहोचल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित दाम्पत्य काही काळापासून वेगळं राहत होतं. पत्नी माहेरी राहात असताना पतीकडून तिला पुन्हा सासरी येण्यासाठी वारंवार प्रयत्न केले जात होते. मात्र, पत्नीने परतण्यास नकार कायम ठेवला होता.या पार्श्वभूमीवर पतीने संतापाच्या भरात थेट कृती करण्याचा निर्णय घेतल्याचे समोर आले. तो रात्री उशिरा पत्नी राहत असलेल्या सोसायटीत गेला. परिसराची पाहणी करून त्याने पार्किंगमध्ये उभी असलेली पत्नीची दुचाकी ओळखली. यानंतर त्याने दुचाकीवर ज्वलनशील पदार्थ टाकून आग लावली. काही वेळातच आगीने तीव्र रूप धारण करत वाहन पूर्णतः जळून गेले. अचानक लागलेल्या आगीमुळे सोसायटीतील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देत तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज




आणि अन्य तपासाच्या आधारे पतीची ओळख पटवण्यात आली आणि त्याला अटक करण्यात आली.या प्रकरणात संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. कौटुंबिक मतभेद वेळेत न सोडवल्यास ते किती गंभीर स्वरूप धारण करू शकतात, याचे हे पुण्यातील एक उदाहरण ठरत आहे.दरम्यान, या घटनेची सध्या परिसरात चांगलीच चर्चा होत आहे. खरेतर पती-पत्नीचे नाते हे विश्वास, प्रेम आणि परस्परांचा सन्मान यावर अवलंबून असते. याच गोष्टी दोघांच्या संसारासाठी महत्त्वाच्या असतात. पण काही वेळेला पती-पत्नीच्या नात्यात कधी विश्वास कमी पडतो, कधी प्रेम कमी पडते तर कधी सन्मान कमी पडतो, त्यातून अशा प्रकारच्या घटना घडतात.

## नऊ वर्षीय मुलीचा रेबीजने मृत्यू

**नालासोपारा :** उनाड कुत्र्यांचा धोका सगळीकडेच वाढला आहे, यामुळे यापूर्वी काहींचे जीव गेले आहेत तर अनेकांना रेबीज सारख्या भयानक रोगाचे संसर्ग झाल्याचे प्रकार यापूर्वी घडले आहेत. मुंबईजवळच्या नालासोपाऱ्यात 9 वर्षीय मुलीला भटक्या कुत्र्याचे नख लागल्याने रेबीज रोगाची लागण झाली, यातच तिचा दुर्दैवाने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. कशिश सहानी असे मृत्यू झालेल्या मुलीचे नाव आहे. नालासोपारा पश्चिम परिसरात ही घटना घडली आहे.कशिश सहानी ही मुलगी नालासोपारा परिसरातील 'मदर मेरी' या शाळेत इयत्ता चौथीमध्ये शिकत होती. नालासोपारा पश्चिमेतील सुबोध सागर इमारतीत आपल्या आई-वडील कुटुंबासमवेत ती राहत होती. सहा महिन्यांपूर्वी ती आपल्या आजोबांबरोबर जात असताना तिला भटक्या कुत्र्याने नख मारले होते. तिला दुसऱ्या दिवशी उपचारासाठी नेण्यात आलं होत. मात्र इंजेक्शनच्या भीतीने ती घाबरल्याने तिला उपचार न करता घरी आणण्यात आलं होतं. त्यानंतर काही दिवसांनी ही जखम भरल्याने हा प्रकार फारसा कोणाच्या लक्षात आला नाही. मात्र चार-पाच दिवसांपूर्वी तिची प्रकृती बिघडली तिने अन्न पाणीच बंद केल.

## २४ दिवसांपासून बेपत्ता नर्सची बॉडी विहिरीत सापडली, नाशकात खळबळ

**नाशिक :** येथील जुना देवपूर रस्त्याजवळील एका विहिरीमध्ये गेल्या २४ दिवसांपासून बेपत्ता असलेल्या परिचारिकेची बॉडी आढळून आली. त्या नाशिक जिल्ह्यातील निफाड येथील एका खासगी रुग्णालयात कार्यरत होत्या. रंभाबाई आनंदा काळे (वय ६०) असे मृत परिचारिकेचे नाव आहे.

रंभाबाई काळे (रा. मामलेदार चौक, निफाड) या बेपत्ता असल्याची तक्रार त्यांचा भाचा प्रवीण घायाळ यांनी निफाड पोलिस ठाण्यात २४ फेब्रुवारी रोजी दाखल केली होती. निफाड पोलिसांनी घटनेचा तपास करताना तांत्रिक विश्लेषणाच्या साहाय्याने मोबाइलमधील सीडीआर तपासला. त्यात संशयित क्रमांक आणि मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे निफाड येथील अरुण बाजीराव ढेपले (वय ४०) याला चौकशीसाठी ताब्यात घेतले होते.त्यावेळी त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. चौकशीअंती त्याला सोडून देण्यात आले. मात्र, प्रकरणाची व्याप्ती वाढल्याचे कानावर आल्यानंतर संशयित अरुण ढेपले याने विष प्राशन करून जीव देण्याचा प्रयत्न केला. त्याच्यावर निफाड येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. उपाचारादरम्यान त्याने पोलिसांजवळ खुनाची कबुली दिली.संशयित अरुण हा दूध विक्रीचा व्यवसाय करतो. दूध देण्याच्या निमित्ताने त्याचे व मृत महिलेची ओळख वाढली. नंतर मृत महिलेकडून पैशाच्या देवाणघेवाणीच्या वादातून त्याने रंभाबाई यांना जीवे मारले, असा आरोप आहे.

दुसरीकडे, नाशिक जिल्ह्यातच निफाड तालुक्यातील पालखेड डाव्या कालव्याच्या परिसरात शनिवारी सायंकाळी कपडे धुण्यासाठी गेलेल्या १८ वर्षीय तरुणीचा पाय घसरून ती पाण्यात पडली. कालव्याच्या वेगवान प्रवाहात ती वाहून गेल्याने तिचा शोध सुरू आहे. नैताळे-बोकडदरे शिवारात ही घटना घडली. ज्योती अनिल शेकरे (वय १८, रा. ओबीधोंड, ता. पेठ) असे तरुणीचे नाव आहे. ज्योती कालव्यावर कपडे धुण्यासाठी गेली असता पाण्याचा अंदाज न आल्याने किंवा पाय घसरल्याने ती पाण्यात पडल्याचे सांगितले जात आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेत प्रशासनाला कळवले. सायंकाळपर्यंत तरुणीचा शोध लागला नव्हता.

# रात्रीच्या अंधारात काळाचा घाला, चिंचवडच्या कुटुंबाची कार बसखाली घुसली, आई-वडील-आजीचा मृत्यू, दोन लेकरं पोरकी

**पुणे :** पुणे-नाशिक महामार्गावर मंचर (ता. आंबेगाव) येथे खासगी बस व कारची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातील तीन जणांचा जागीच मृत्यू झाला असून, दोन मुले जखमी झाली आहेत. एकाच वेळी आई-वडिलांसह आजीचंही छत्र हरपल्याने किशोरवयीन मुलं पोरकी झाली आहेत.मल्लिकार्जुन शिवराज आंबेगावे (वय ४८), त्यांच्या पत्नी आरती (वय ४०) व त्यांच्या आई लता तूपलोंढे (वय ६३, रा. तिघेही चिंतामणी कॉलनी, वाल्हेकरवाडी चिंचवड) अशी मृतांची नावे आहेत. आंबेगावे यांची मुलगी मृणाल (वय १६) आणि मुलगा प्रेम (२०) हे जखमी असून, त्यांच्यावर मंचर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती स्थिर आहे, अशी माहिती



वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली.मल्लिकार्जुन आंबेगावे नाशिकहून एक कार्यक्रम उरकून पिंपरी-चिंचवडकडे घराकडे परतत होते. मंचरजवळील एकलहरे येथे रात्री अकरा वाजता त्यांचा कारवरील ताबा सुटल्याने ती दुभाजक ओलांडून थेट विरुद्ध दिशेने पुण्याकडून नाशिककडे जाणाऱ्या खासगी बसवर जाऊन आदळली. ही धडक एवढी भीषण होती, की कारचा चक्काचूर झाला आणि ती बसच्या खाली घुसली. अपघातात तिघांचाही जागीच मृत्यू झाला होता. कार बसखाली अडकल्यामुळे कारमधील प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी कसरत करावी लागली. सर्वांना तातडीने मंचर उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. तेथील डॉक्टरांनी तपासून तिघांना मृत घोषित केले.बसचालक राजू चत्रू राठोड (वय ३८, रा. उजळत, ता. शहादा, जि. नंदुरबार) याने मंचर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. या अपघातात आंबेगावे यांचा मुलगा व मुलगी बचावले असून, त्यांच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. खासगी बसमधील काही प्रवासी किरकोळ जखमी आहेत, अशी माहिती मंचर पोलिस ठाण्याचे निरीक्षक श्रीकांत कंकाळ व सहायक फौजदार सनील धनवे यांनी दिली. पोलिसांनी आंबेगावे यांच्याविरोधात निष्काळजीपणे वाहन चालविल्याबद्दल गुन्हा दाखल केला आहे.महामार्गावरील सुधारणांची कामे बाकी असल्यामुळेच व महामार्गाची रचना सदोष असल्याने या भागात वारंवार अपघात होतात, असा आरोप येथील स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे.या अपघातात मल्लिकार्जुन आंबेगावे आणि त्यांच्या पत्नी आरती मृत्युमुखी पडले. त्यांची दोन्ही मुले वाचली. मात्र, आई-वडिलांचे छत्र हरपल्याने ही मुले पोरकी झाली. आई-वडिलांबरोबरच आजीलाही गमावण्याची वेळ या मुलांवर आली. त्यामुळे परिसरातून हळहळ व्यक्त करण्यात आली.

# ऐनवेळी आयपीएलमधून माघार, दिल्ली कॅपिटल्सला झटका; तीन वर्षांच्या बंदीला सामोरे जावे लागणार

**मुंबई/वृत्तसंस्था** : आयपीएल 2026 ला सुरु होण्यासाठी आता काहीच दिवस शिल्लक आहेत. आयपीएल अवघ्या काही दिवसांवर असताना परदेशी खेळाडू अचानक आयपीएलच्या स्पर्धेतून बाहेर पडताना दिसत आहे. काही परदेशी खेळाडूंना दुखापत असल्यामुळे त्यांच्या स्पर्धेत सामील होण्याबाबत अजूनही प्रश्नचिन्ह आहेत. आता या दरम्यान दिल्ली कॅपिटल्सबाबत एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे.आयपीएल सुरू होण्यापूर्वीच दिल्ली कॅपिटल्सला मोठा धक्का बसला आहे. इंग्लंडचा स्टार फलंदाज Ben Duckett आयपीएलमधून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे, त्याने आपले आंतरराष्ट्रीय करिअर वाचवण्यासाठी हे पाऊल उचलले आहे, पण आता त्याला तीन वर्षांच्या बंदीला सामोरे जावे




लागणार आहे. लिलावात दिल्ली कॅपिटल्सने डकेटला 2 कोटी रुपयांना विकत घेतले होते आणि केएल राहुलसोबत सलामीला महत्त्वाची भूमिका बजावेल अशी अपेक्षा होती. मात्र, स्पर्धा सुरू होण्यापूर्वी केवळ चार दिवस शिल्लक असताना, त्याने या हंगामात सहभागी होणार नसल्याचे स्पष्ट केले.'द टेलिग्राफ'शी बोलताना डकेटने आपल्या निर्णयाबद्दल सांगितले की, हा त्याच्यासाठी खूप कठीण निर्णय होता आणि सहभागी होऊ न शकल्याबद्दल तो दिल्ली संघाची माफी मागतो. जेव्हा त्याने लिलावात प्रवेश केला, तेव्हा त्याला वाटले होते की ही एक उत्तम संधी असेल. दिल्लीसारख्या संघात निवड होणे खूप खास होते. आयपीएल ही जगातील सर्वोत्तम लीग आहे, जिथे अव्वल खेळाडू खेळतात आणि हा एक अद्भुत अनुभव ठरला असता.त्याने पुढे असेही म्हटले आहे की, ठआयपीएलमध्ये एकही सामना न खेळता तो निरोप घेईल की नाही हे त्याला माहीत नाही. तो आता 31 वर्षांचा आहे, त्यामुळे पुनरागमन करणे सोपे नसेल. पण त्याला आशा आहे की एक दिवस तो दिल्लीचे प्रतिनिधित्व करेल. त्याने यावर खूप विचार केला आहे आणि त्याला वाटते की त्याच्या कारकिर्दीसाठी हा योग्य निर्णय आहे."डकेटला सध्या इंग्लंड संघात आपले स्थान मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित करायचे आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सातत्यपूर्ण संधी मिळवण्यासाठी त्याने फ्रँचायझी क्रिकेटपासून दूर जाण्याचा निर्णय घेतला आहे. आयपीएलच्या नियमांनुसार, शेवटच्या क्षणी माघार घेणाऱ्या परदेशी खेळाडूंवर कठोर कारवाई होऊ शकते. डकेटवर तीन वर्षांसाठी आयपीएलमध्ये सहभागी होण्यावर बंदी घातली जाऊ शकते, जो त्याच्या टी-20 कारकिर्दीसाठी एक मोठा धक्का ठरू शकतो. या निर्णयाचा दिल्ली कॅपिटल्सच्या रणनीतीवर परिणाम झाला आहे, तसेच खेळाडूंना आंतरराष्ट्रीय क्रिकेट आणि लीग क्रिकेटमध्ये संतुलन साधणे किती कठीण आहे हे देखील यातून दिसून येते.

## IPL चार दिवसांवर असताना BCCIचे नवीन नियम; विराट, रोहित, धोनी सर्वांचेच वांदे

**मुंबई/वृत्तसंस्था** : आयपीएल २०२६ स्पर्धेला सुरूवात व्हायला फक्त चार दिवस बाकी आहेत. पहिला सामना गतवर्षीचा चॅम्पियन संघ आरसीबी आणि सनरायजर्स हैदराबादमध्ये पार पडणार आहे. हा सामना बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियवर होणार असून चाहत्यांना उत्सुकता लागली आहे. यंदाच्या सीझनला सुरूवात होण्याआधी बीसीसीआयने महत्त्वात्या सात गाइडलाइन्स सांगितल्या आहेत. या सर्व संघांसाठी असून त्याचं पालन सर्वांना करावं लागणार आहे. ज्यांच्याकडून पालन होणार नाही त्यांनी सुरूवातीला ताकीद दिली जाईल. परंतु त्यानंतरही या सूचनांचे पालन नाही केले तर त्यांना आर्थिक दंड बसणार आहे. आयपीएलच्या या नवीन सूचना नेमक्या काय आहेत जाणून घ्या.बीसीसीआयने आयपीएलधील संघांना ज्या दिवशी मॅच असेल त्या दिवशी सराव सत्र घेण्यास मनाई केली आहे. त्यामुळे आता ज्या दिवशी मॅच असणार त्या दिवशी दोन्ही संघाना सराव घेता येणार नाहीये. ज्या दिवशी सराव सत्र असणार आहे त्यावेळी दोन नेट्स देण्यात येतील. मात्र रेंज हिटिंगसाठी मैदानाची कोणतीही एक बाजूच दिली जाणार आहे. त्यासोबतच खुल्या नेटला आता परवानगी नसणार आहे.जरी एखाद्या




संघाचे सत्र लवकर संपले तर दुसरा संघ त्यांचे विकेट वापरू शकणार नाही. महत्त्वाचं म्हणजे सामन्याच्या दिवशी ग्राऊंडवर कोणतीही फिटनेस टेस्ट होणार नाही.

त्यासोबतच ज्या दिवशी सराव सत्र असणार त्या दिवशी सर्व खेळाडूंना एकाच बसमधून प्रवास करावा लागणार आहे. संघा दोन गटांमध्ये विभागला जाऊ शकतो. कुटुंबातील सदस्यांसोबत एकत्र प्रवास करता येणार नाही. त्यांना वेगळ्या वाहनांमधून प्रवास करावा लागणार आहे. स्टेडियममध्ये त्यांना हॉस्पिटॅलिटी एरियामधून मॅच पाहता येणार आहे.सराव करताना खेळाडूंना एलईडीवर चेंडू मारता येणार नाही. त्यासोबतच सपोर्ट स्टाफ आणि खेळाडूंना एलईडी बोर्डसमोर बसता येणार नाहीये. ज्या खेळाडूंकडे ऑरेंज कॅप किंवा पर्पल कॅप असणार आहे त्यांना त्या परिधान कराव्या लागणार आहेत.

## आयपीएलच्या तोंडावर रिंकू सिंगचे नशीब चमकले

**मुंबई** : इंडियन प्रीमियर लीगबद्दलची उत्सुकता वाढत आहे. आयपीएलसाठी काउंटडाउन सुरू झाले आहे. ही स्पर्धा शनिवार, 28 मार्च रोजी सनरायझर्स हैदराबाद आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळूर यांच्यातील सामन्याने सुरू होणार आहे. आता, कोलकाता night रायडर्स फ्रँचायझीने अचानक एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. स्पर्धा सुरू होण्यापूर्वी, संघाच्या उपकर्णधाराची घोषणा केली आहे. IPL 2026 च्या आधी कोलकाता नाईट रायडर्सने Rinku Singh संघाच्या उपकर्णधारपदी नियुक्ती करून एक मोठी घोषणा केली आहे. केकेआरसोबतचा हा रिंकू सिंगचा आठवा हंगाम असून, त्याने आता ही जबाबदारी स्वीकारली आहे. रिंकू सिंगने 2018 मध्ये कोलकाता नाईट रायडर्सकडून आयपीएलमध्ये पदार्पण केले होते, ज्यात त्याने केवळ 29 धावा केल्या होत्या.

पुढच्या हंगामात तो फक्त 37 धावा करू शकला आणि त्यानंतर त्याने केवळ एकच सामना खेळून 11 धावा केल्या. आज तो कोलकाता संघातील सर्वोत्तम फिनिशर आहे आणि त्याची उपकर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली आहे.रिंकू सिंगने 51 आयपीएल डावांमध्ये 1099 धावा केल्या आहेत. त्याची फलंदाजीची सरासरी 30.52 असून त्याचा स्ट्राइक रेट 145 पेक्षा जास्त आहे.

## आरसीबीलाही मिळाला नवा मालक

**मुंबई/वृत्तसंस्था** : आयपीएल 2026 च्या आधी, आरसीबी फ्रँचायझीबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. राजस्थान रॉयल्सच्या विक्रमी करारानंतर, आता Royal Challengers Bengaluru साठी एक ऐतिहासिक करार झाला आहे. वृत्तानुसार, आदित्य बिर्ला ग्रुपच्या नेतृत्वाखालील एका संघाने अंदाजे ₹16,706 कोटीमध्ये आरसीबीचे अधिग्रहण केले आहे. या संघात टाइम्स ऑफ इंडिया ग्रुप, बोल्ट व्हेंचर्स आणि ब्लॅकस्टोनच्या प्रायव्हेट इक्विटी युनिटचाही समावेश आहे.

क्रिकबझच्या वृत्तानुसार, या संघाने युनायटेड स्पिरिट्स लिमिटेड सोबतच्या करारामध्ये आरसीबीमधील 100% हिस्सा विकत घेतला आहे. विशेष म्हणजे, या करारामध्ये आयपीएल आणि डब्ल्यूपीएलचे विद्यमान विजेते असलेले आरसीबीचे पुरुष आणि महिला दोन्ही संघ समाविष्ट आहेत. या करारामुळे, आरसीबी आता टी20 क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात महागडी फ्रँचायझी बनली आहे. राजस्थान रॉयल्स अलीकडेच अंदाजे ₹15,300 कोटींना विकली गेली होती, परंतु आरसीबीने तो विक्रम मोडला आहे.या नवीन करारानुसार नेतृत्वाची जबाबदारीही निश्चित करण्यात आली आहे. आर्यमन विक्रम बिर्ला यांची अध्यक्षपदी, तर टाइम्स इंटरनेटचे अध्यक्ष सत्यन गजवानी यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती




करण्यात येईल. डेव्हिड ब्लिट्झर आणि विरल पटेल हे देखील गुंतवणूकदार गटाचा भाग आहेत. कुमार मंगलम बिर्ला यांनी या प्रसंगी सांगितले की, गेल्या दोन दशकांत आयपीएल एक जागतिक क्रीडा शक्ती बनली आहे आणि तिने भारतीय क्रिकेटचे स्वरूप बदलले आहे. आरसीबीसारखी मोठी फ्रँचायझी आम्हाला जागतिक क्रीडा क्षेत्रात आमचे स्थान अधिक मजबूत करण्याची एक उत्तम संधी देते. आम्ही हा वारसा पुढे नेण्यासाठी कटिबद्ध आहोत.मात्र, या मोठ्या कराराला अद्याप बीसीसीआय आणि सीसीआयकडून अंतिम मंजुरी मिळणे बाकी आहे. जर या कराराला पूर्णपणे मंजुरी मिळाली, तर आयपीएल 2026 पूर्वी आरसीबी एका नवीन ओळखीसह आणि नवीन मालकांसह मैदानात उतरताना दिसेल. आयपीएलचे ब्रँड मूल्य सातत्याने नवनवीन उंची गाठत आहे आणि जगभरातील प्रमुख गुंतवणूकदार त्यात रस दाखवत आहेत.

# हेझलवूडच्या दुखापतीबाबत RCB कडून अधिकृत विधान जारी




**मुंबई/वृत्तसंस्था** : आयपीएलला आता 28 मार्चपासून सुरुवात होणार आहे. अवघे काही दिवस शिल्लक असताना प्रत्येक संघ मोठ मोठ्या घोषणा करत आहे. काही संघातील खेळाडूंना दुखापत झाली असल्यामुळे स्पर्धेतून माघार घेतली आहे. तर काही परदेशी खेळाडू अजूनही संघात सामील झाले नाही. या दरम्यान रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरुने जोश हजलेवूड च्या सहभागाबद्दल एक विधान केले आहे.

गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळूरने जोश हेझलवूडबाबत एक महत्त्वपूर्ण विधान केले आहे. हेझलवूड संघात कधी सामील होईल, असा प्रश्न चाहते बऱ्याच काळापासून विचारत होते. दरम्यान, आरसीबी फ्रँचायझीने आता या प्रकरणावर स्पष्टीकरण दिले आहे. आरसीबीने म्हटले आहे की, क्रिकेट ऑस्ट्रेलिया त्याच्या दुखापतीतून पूर्णपणे बरे होण्यावर समाधानी झाल्यावरच हेझलवूड संघात सामील होईल. आरसीबीचे संचालकांनी सांगितले की, फ्रँचायझी क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या सतत संपर्कात आहे आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्याही संपर्कात आहे. हेझलवूडचे रिहॅब सध्या ऑस्ट्रेलियामध्ये सुरू आहे. हेझलवूड हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीने त्रस्त आहे. 35 वर्षीय हेझलवूड हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीने त्रस्त आहे. नोव्हेंबरमध्ये शेफिल्ड शील्ड स्पर्धेदरम्यान त्याला ही दुखापत झाली होती. परिणामी, तो 2026 च्या टी-20 विश्वचषकाला मुकला. संचालकांनी सांगितले की, "आरसीबीच्या 2025च्या विजयात हेझलवूडने महत्त्वाची भूमिका बजावली होती. अशा परिस्थितीत, सर्व काही क्रिकेट ऑस्ट्रेलियावर अवलंबून आहे. त्याच्या पुनरागमनाची कोणतीही तारीख अद्याप निश्चित झालेली नाही."संचालक म्हणाले की, "बहुतेक लोकांना माहीत आहे की, दुखापतीमुळे हेझलवूडने आधीच बरेच क्रिकेट सामने गमावले आहे. आम्ही क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या सतत संपर्कात आहोत आणि आमची वैद्यकीय टीमही त्याच्या संपर्कात आहे. आम्ही त्याच्याशी दररोज संवाद साधत राहू. क्रिकेट ऑस्ट्रेलिया हेझलवूडच्या तंदुरुस्तीबद्दल समाधानी होताच, तो परत येईल. आम्ही त्याच्या आगमनाची वाट पाहत आहोत."

आयपीएलचा पहिला सामना हा सनरायझर्स हैदराबाद आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरुमध्ये रंगणार आहे. आयपीएलचा पहिला सामना हा चिन्नास्वामीच्या स्टेडियमवर रंगणार आहे.

# कार दुभाजकावर आदळून उलटली, प्रसिद्ध अभिनेत्री हरशील कालिया हिचा मृत्यू, ऐन तिशीत जगाचा निरोप..

अभिनेत्री आणि मॉडेल Harshil Kalia हिचा सोमवारी रात्री झालेल्या कार अपघातात मृत्यू झाला. नियंत्रण सुटल्याने कार दुभाजकावर आदळून हर्षिलचा मृत्यू झाला. ती अवघ्या ३० वर्षांची होती. राजस्थानमधील जयपूर येथे सोमवारी रात्री साधारण ११:३० वाजता शिप्रा पथ रस्त्यावर हर्षिल कालिया हिचा अपघात झाल्याची माहिती आहे.

हर्षिल कालिया शूटिंगवरुन घरी परत येत असताना हा अपघात झाला. तिची कार दुभाजकावर जोरात आदळून उलटली. या घटनेचं सीसीटीव्ही फूटेज समोर आलं असून धडक बसल्यानंतर कार डाव्या बाजूला कलंडल्याचे दिसून येते.अपघातानंतर स्थानिक रहिवाशांनी घटनास्थळी धाव घेतली. कार पुन्हा सरळ करण्यास मदत केली आणि हर्षिलला बाहेर काढलं. तिला तात्काळ जवळच्या एका खाजगी रुग्णालयात नेण्यात आलं, मात्र डोक्याला झालेल्या गंभीर दुखापती झाल्यामुळे तिचा मृत्यू झाल्याचं डॉक्टरांनी घोषित केलं.अपघाताचे नेमकं कारण शोधण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांनी तपास सुरु केला आहे. तिची कार भरधाव वेगात होती का, किंवा अन्य एखाद्या वाहनाने तिला




ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला होता का, याचा शोध घेतला जात आहे. शवविच्छेदन करण्यात आले असून बॉडी तिच्या कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आली आहे.हर्षिल कालिया अभिनय, सूत्रसंचालन आणि मॉडेलिंग या क्षेत्रांमध्ये आपली कारकीर्द घडवत होती. 'Disney+ Hotstar' वर प्रदर्शित झालेल्या 'Crime Next Door' या वेब सीरिजमध्ये ती दिसली होती; यामध्ये तिने अनुप्रिया गोएंका, यशपाल शर्मा, साहिल वैद आणि वत्सल शेठ यांसारख्या कलाकारांसोबत काम केलं होतं.अभिनयाव्यतिरिक्त, तिने वृत्त निवेदिका म्हणूनही काम केलं होतं. अनेक राजस्थानी संगीत व्हिडिओंमध्ये ती मुख्य भूमिकेत झळकली होती. अगदी अलिकडच्या काळात ती मॉडेलिंगमध्येही सक्रिय होती.

हर्षिलला अगदी लहान वयातच कला क्षेत्रात विशेष आवड निर्माण झाली होती. शालेय जीवनात ती सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होत असे. पुढे तिने भातखंडे विद्यापीठात कथकचे प्रशिक्षण घेतले. २०११ मध्ये यातच तिने पदवी मिळवली.सौंदर्यस्पर्धांमध्येही हर्षिलने विशेष ओळख कमावली होती; 'मिस दिवा राजस्थान २०२१' आणि 'मिस पिंक सिटी' या स्पर्धांमध्ये तिने 'प्रथम उपविजेतेपद' पटकावले होते.हर्षिलचे वडील पत्रकारितेशी संबंधित असून, ते एका खाजगी वृत्तपत्रात कार्यरत आहेत. तिच्या अकाली निधनामुळे तिचे कुटुंबीय, मित्र परिवार आणि सहकारी यांना मोठा धक्का बसला आहे. या घटनेने तिची कारकीर्द दुर्दैवाने अर्धवट राहिल्याने चाहत्यांकडूनही हळहळ व्यक्त होत आहे

## साठीच्या उंबरठ्यात अभिनेत्याचं २६ वर्षीय तरुणीसोबत लग्न, टोमण्यांमुळे नात्यात दुरावा?

झगमगत्या विश्वातील सेलिब्रिटी त्यांच्या प्रोफेशनल आयुष्यामुळे कमी पण खासगी आयुष्यामुळे कायम चर्चेत असतात. आता देखील एका प्रसिद्ध अभिनेत्याच्या खासगी आयुष्याची सर्वत्र चर्चा रंगली आहे. खुद्द अभिनेत्याने देखील त्याच्या खासगी आयुष्यावर मोठं वक्तव्य केलं आहे. सांगायचं झालं तर, अभिनेत्याचं पहिलं लग्न 2006 मध्ये झालं, पण पहिल्या पत्नीसोबत त्यांचं नातं फार काळ टिकलं नाही. अखेर 2009 मध्ये त्यांनी घटस्फोट घेत नातं संपवलं. त्याने 22 एप्रिल 2018 मध्ये वयाच्या 52 व्या वर्षी 26 वर्षीय तरुणीसोबत लग्न केलं. त्यानंतर अभिनेत्याला मोठ्या प्रमाणात ट्रोलिंगचा सामना करावा लागला... दरम्यान, एका मुलाखतीत अभिनेत्याने यावर देखील मोठं वक्तव्य केलं आहे.सध्या ज्या अभिनेत्याच्या खासगी आयुष्याची चर्चा रंगली आहे, तो अभिनेता दुसरा तिसरा कोणी नाही तर, अभिनेता मिलिंद सोमण आहे. 2018 मध्ये मिलिंद याने 26 वर्षीय अंकिता कोंवर हिच्यासोबत लग्न केलं. लग्नानंतर अभिनेत्याला अनेकांना टोमणे मारले... पण या टोमण्याचा परिणाम अभिनेत्याच्या 26 वर्षीय



बायकोवर झाला... अशा परिस्थितीत मिलिंद याने बायकोच्या बाजूने भक्कम उभा राहिला... एका मुलाखतीत मिलिंद म्हणाला, 'कोण काय बोलतंय याचा मला कोणताच फरक पडत नव्हता... पण अंकिता हिच्या मनावर खोलं परिणाम झालेला. कारण तिला फारसा अनुभव नव्हता... आम्ही याबद्दल चर्चा केली... मी तिला सांगितलं, टोमणे मारणाऱ्यांना तू ओळखत नाहीस आणि मी देखील ओळखत नाही... त्यामुळे ते जे काही बोलत आहेत, ते त्यांचे विचार आहेत... अंकिताने ही गोष्ट फार लवकर समजून घेतली... त्यामुळे याचं श्रेय पूर्णपणे तिला जातं... तिची समज घातल्यानंतर, तिने ट्रोलिंगबद्दल कधीच विचार केला नाही आणि मला असं वाटतं याच कारणामुळे आमचं नातं आणखी घट्ट झालं आहे.

## भयानक परिस्थितीत अडकलेला अर्जुन रामपाल म्हणाला...

अभिनेता अर्जुन रामपालसाठी 'धुरंधर' सिनेमा फक्त सिनेमा नाही तर, 2008 मध्ये पाकिस्तानी दहशतवाद्यांनी मुंबईवर केलेल्या हल्ल्याचा बदला आहे. मुंबईवर झालेल्या हल्ल्यात अनेक लोकांचे प्राण गेले... जेव्हा हल्ला झाला तेव्हा अभिनेता अर्जुन रामपाल कुठे आणि कोणत्या परिस्थितीत होता... याबद्दल अभिनेत्याने सांगितलं आहे. एवढंच नाही तर, तब्बल हल्ल्याच्या 17 वर्षांनंतर रामपाल याने मोठा खुलासा केला आहे. सध्या सर्वत्र फक्त आणि फक्त अर्जुन रामपाल याने सांगितलेल्या घटनेची चर्चा रंगली आहे.सांगायचं झालं तर, रविवारी झालेल्या एका कार्यक्रमात अर्जुन याला पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. यावेळी अभिनेता म्हणाला, '2008 मध्ये 26/11 दरम्यान, मी ताज हॉटेल मध्येच असतो, जर माझ्या मित्राने यायला उशीर केला नसता... त्या दिवशी माझा वाढदिवस होता. वाढदिवस साजरा करण्यासाठी मी माझ्या मित्रांसोबत ताज हॉटेलमध्ये जाणार होतो... पण एका मित्राला येण्यासाठी उशीर झाला होता.

## गौरव मोरेचं लवकरच छोट्या पडद्यावर कमबॅक, मोठ्या पडद्यावरही झळकणार अभिनेता

महाराष्ट्राची हास्यजत्रा हा लोकप्रिय कार्यक्रम असून या कार्यक्रमानं अनेक नवोदित कलाकारांना इंडस्ट्रीत नाव कमावण्याची संधी दिली. वनिता खरात, इशा डे, निखिल बने, श्रमेश बेटकर, ओंकार भोजने, गौरव मोरे यांसारख्या अनेक कलाकरांना हास्यजत्रेमुळे प्रसिद्धी मिळाली आणि ते घराघरात पोहोचले. या कलाकारांना मोठ्या पडद्यावर झळकण्याचीही संधी मिळाली. गौरव मोरेनं अचानक हास्यजत्रा सोडली, यामुळे चाहत्यांना धक्का बसलेला. 'सारखं तेच तेच व्हायचं, त्यामुळे वेगळं काहीतरी करायचं होतं' असं गौरवने एका मुलाखतीदरम्यान 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' सोडण्याचं कारण सांगताना सांगितलेलं. आता गौरव मोरे लवकरच छोट्या आणि मोठ्या पडद्यावर झळकणार असल्याचं त्यानं एका मुलाखतीमध्ये सांगितलंय.'महाराष्ट्राची हास्यजत्रा' सोडल्यानंतर गौरव काही सिनेमांमध्ये झळकला. त्याचबरोबर त्यानं 'चला हवा येऊ द्या'च्या दुसऱ्या पर्वात काम केलं. या पर्वाला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर गौरव झी चित्र गौरव २०२६ या पुरस्कार सोहळ्यातही दिसलेला. त्यानंतर गौरवला नव्या प्रोजेक्टमध्ये पाहण्यासाठी चाहत्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.गौरव मोरेनं 'महाराष्ट्र



टाइम्स'च्या 'मटा सन्मान २०२६' या सोहळ्याला हजेरी लावलेली. या सोहळ्यादरम्यान साधलेल्या संवादात गौरव मोरे म्हणाला की, 'मला खूप छान वाटतंय. कारण मी खूप वर्षांपूर्वी मटा सन्मानमध्ये स्किट केलेलं. त्यानंतर एक वर्ष मी आलेलो असाच. दरवर्षी येतो आणि छान वाटतं येऊन. कधीतरी आपल्यालाही नॉमिनेशन मिळेल असं वाटतं आणि हा पुरस्कार मिळेल. कारण, हा पुरस्कार तुमच्या कामाची पावती असते. त्या पुरस्कारामुळे एक जिद्द मिळते. आपला मटा सन्मान हा खूप मानाचा आणि मोठा सोहळा आहे.'आगामी प्रोजेक्टबद्दल विचारलं असता गौरव म्हणाला की, 'मी लवकरच छोट्या पडद्यावर पण येणार आहे आणि मोठ्या पडद्यावर पण येणार आहे. एक-दोन प्रोजेक्ट सुरू आहेत.

# या चित्रपटाने ४ दिवसांमध्ये केली रेकॉर्ड ब्रेक कमाई, २० कोटी बजेटमध्ये

बॉक्स ऑफिसवर सध्या मोठ्या बजेटच्या आणि छोट्या बजेटच्या चित्रपटांमध्ये जोरदार स्पर्धा पाहायला मिळत आहे. 'धुरंधर 2' हा चित्रपट गेल्या गुरुवारी प्रदर्शित झाला असून त्याने जगभरात 700 कोटी रुपयांहून अधिक कमाई करत दमदार कामगिरी केली आहे. या चित्रपटात रणवीर सिंह मुख्य भूमिकेत आहेमात्र, या बिग बजेट चित्रपटासोबतच प्रदर्शित झालेल्या एका लहान बजेटच्या मल्याळम चित्रपटाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. 'आडू 3' या कॉमेडी चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अनपेक्षितपणे मोठा धमाका केला आहे.चित्रपटाच्या निर्मात्यांनी सोशल मीडियावर दिलेल्या माहितीनुसार, 'आडू 3' ने ओपनिंग वीकेंडमध्ये जगभरात सुमारे 87 कोटी रुपयांची कमाई केली. सोमवारीही चित्रपटाने चांगली कमाई कायम ठेवत एकूण कलेक्शन 90 कोटी रुपयांच्या पुढे नेले आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटाचे बजेट फक्त 20 कोटी रुपये आहे. त्यामुळे अवघ्या काही दिवसांतच चारपट कमाई करून या चित्रपटाने मोठे यश मिळवले आहे.

केरळमध्ये तर 'आडू 3' ने धुरंधर 2 ला मागे टाकत आघाडी घेतली आहे. या चित्रपटात जयसूर्या मुख्य भूमिकेत असून त्याच्यासोबत विनायकन, विजय बाबू आणि सनी वेन यांसारखे कलाकारही झळकले आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन मिधुन मैनुएल थॉमस यांनी केले आहे. यामध्ये विनोद आणि फँटसीचा भन्नाट संगम प्रेक्षकांना पाहायला मिळत आहे. 'आडू 3' च्या कथानकाला आणि कलाकारांच्या अभिनयाला प्रेक्षकांकडून जोरदार प्रतिसाद मिळत आहे. मोठी स्टारकास्ट आणि प्रचंड बजेट असलेल्या चित्रपटासमोरही एक दमदार कथा आणि मनोरंजन प्रेक्षकांना थिएटरमध्ये खेचू शकते हे या चित्रपटाने सिद्ध करून दाखवले आहे. जरी 'धुरंधर 2' ने जागतिक स्तरावर 700 कोटींचा टप्पा पार केला असला तरी 'आडू 3' सारख्या लहान बजेटच्या चित्रपटाने दिलेली टक्कर ही चित्रपटसृष्टीसाठी महत्त्वाची बाब मानली जात आहे. विशेषतः केरळ बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाने मोठ्या चित्रपटालाही मागे टाकत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शेगाव तालुक्यातील रिक्त ग्रामपंचायत सदस्य पदांसाठी पोटनिवडणूक जाहीर

**जनसंचलन/बुलढाणा**




राज्य निवडणूक आयोगाकडून घोषीत केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार शेगाव तालुक्यांतील पाच ग्रामपंचायतींच्या रिक्त थेट सरपंच व सदस्यांच्या पोट निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये येऊलखेड, चिंचखेड, सगोडा, टाकळी व धारवला मुरा असे पाच रिक्त ग्रामपंचायत सदस्य पदाच्या जागासाठी निवडणूक होणार आहे. या ग्रामपंचायतींमध्ये आचारसंहिता लागू असून निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन शेगाव तहसिलदार तथा ग्रामपंचायत निवडणूक अधिकारी यांनी केले आहे. निवडणूकीची अधिसूचना सोमवार दि. ३० मार्च २०२६ रोजी संबधित तहसिल कार्यालय व ग्रामपंचायत कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. या कार्यक्रमानुसार निवडणुकीकरीता नामनिर्देशनपत्र दि. ७ ते १३ एप्रिल २०२६ पर्यंत सकाळी ११ वाजेपासून ते दुपारी ३ वाजेदरम्यान स्वीकारले जाणार आहे. नामनिर्देशन पत्र छाननी बुधवार दि. १५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजूपासून छाननी संपेपर्यंत. दि. १७ एप्रिल २०२६ रोजी नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली आहे. या निवडणूकीचे मतदान मंगळवार दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायं ५.३० वाजेपर्यंत होणार असून मतमोजणी बुधवार दि. २९ एप्रिल २०२६ रोजी करण्यात येणार आहे, असे प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# सावत्र आईकडून मारहाण होत असलेल्या बालिकेची सुटका

**जनसंचलन/बुलढाणा**

मलकापूर येथील वरखेड गावात सावत्र आईकडून मारहाण होत असलेल्या १४ वर्षीय बालिकेची चाईल्ड हेल्प लाइन १०९८, जिल्हा बाल संरक्षण कक्ष व मलकापूर ग्रामीण पोलिसांनी संयुक्त कारवाई करत सुटका केली.दि. २२ मार्च २०२६ रोजी या घटनेची माहिती चाईल्ड हेल्प लाईनला प्राप्त होताच प्रकल्प समन्वयक शेख सोहेप यांनी तातडीने दखल घेतली. त्यांनी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी दिवेश मराठे तसेच बाल कल्याण समिती यांना माहिती देऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कार्यवाही सुरू केली. यानंतर चाईल्ड हेल्प लाईनच्या पथकाने वरखेड येथे भेट देऊन चौकशी केली असता संबंधित बालिकेला सावत्र आईकडून मारहाण होत असल्याचे निष्पन्न झाले. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन तात्काळ मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशनला कळविण्यात आले. चाईल्ड हेल्प लाईनच्या पथकाने बालिकेसह तिच्या मोठ्या भावाला ताब्यात घेऊन पोलिस स्टेशनमध्ये आणले. पोलिसांनी चौकशी करून संबंधित सावत्र आईविरुद्ध गुन्हा दाखल केला. तसेच बालिकेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. बालिकेला बाल कल्याण समितीसमोर हजर करण्यात आले असता, समितीच्या आदेशानुसार तिला संरक्षण व काळजीच्या दृष्टीने सखी वन स्टॉप सेंटर, बुलडाणा येथे दाखल करण्यात आले. यानंतर चाईल्ड हेल्प लाईनच्या समुपदेशकांनी बालिकेचे समुपदेशन केले. सदर प्रकरणाची पुढील कार्यवाही बाल कल्याण समिती, बुलडाणा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# क्षयरोगमुक्त जिल्ह्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा -मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात

**जनसंचलन/बुलढाणा**

क्षयरोग हा पूर्णपणे बरा होऊ शकणारा आजार असून वेळेवर निदान आणि योग्य उपचार घेतल्यास रुग्ण पूर्णपणे निरोगी होऊ शकतो. क्षयरोग संदर्भात ग्रामस्तरावर व्यापक जनजागृती होणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी सर्वांनी एकत्र येऊन क्षयरोगमुक्त जिल्हा करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी केले. जिल्हा परिषदच्या शिवाजी महाराज सभागृहात जागतिक क्षयरोग दिनानिमित्त आयोजित टिबी मुक्त ग्रामपंचायत तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिवशंकर भारसाकळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.वर्षा गट्टे, क्षयरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. दिनकर खेरोडकर आदी उपस्थित होते. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. क्षयरोगाची लक्षणे सुरुवातीला साधी वाटत असली तरी ती दुर्लक्षित केल्यास गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे क्षयरोगाच्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता त्वरित जवळच्या शासकीय आरोग्य केंद्रात जाऊन तपासणी करून घ्यावी. जिल्हा क्षयरोगमुक्त करण्यासाठी आरोग्य विभाग, प्रशासन आणि नागरिक यांचा सहभाग महत्त्वाचा असून सर्वांनी एकत्र येऊन जनजागृती करणे ही काळाची गरज आहे. क्षयरोगमुक्त समाज निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी केले. २०३० पर्यंत क्षयरोग मुक्तीचे ध्येय जागतिक आरोग्य संघटनेच्या उद्दिष्टानुसार क्षयरोग मुक्त करण्यासाठी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात विविध उपक्रम राबविले जात आहेत. केंद्र शासनाने क्षयरोग मुक्त पंचायत या अभिनव उपक्रमाची सुरुवात केली होती. या अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर आरोग्य तपासणी, जनजागृती आणि रुग्ण शोध मोहीम प्रभावीपणे राबविली. जिल्ह्यात सन २०२५मध्ये एकूण २ हजार ४९८ क्षयरुग्ण आढळले होते, तर जानेवारी ते मार्च २०२६ दरम्यान ४९७ रुग्ण नोंदवण्यात आले आहेत. रुग्णांच्या सोयीसाठी आणि जलद निदानासाठी जिल्ह्यात अत्याधुनिक यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. यात डिजिटल हॅन्डहेल्ड एक्स-रे मशीन्स व मशीन्स आणि ११ या यंत्रांच्या सहाय्याने ग्रामीण भागातही क्षयरोगाचे अचूक निदान करणे शक्य झाले आहे. जागतिक क्षयरोग दिनाचे औचित्य साधून २०२५ सालामध्ये राबवण्यात आलेल्या क्षयरोग मुक्त पंचायतफअभियानात बुलढाणा जिल्ह्यातील ३२६ ग्रामपंचायतींनी निकषांची पूर्तता केली असून, त्यापैकी २२ ग्रामपंचायतींना मानाचा सुवर्ण () पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच लोकसहभागातून टीबी मुक्त भारत अभियान पंतप्रधान टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत जिल्ह्यात निक्षय मित्रांच्या माध्यमातून ७ हजार १६६ फूड बास्केटचे (पौष्टिक आहार) वाटप रुग्णांना करण्यात आले आहे. या मदतीमुळे रुग्णांच्या उपचाराला गती मिळत आहे. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत सन २०२५ मध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल क्षयरोग पथक बुलढाणा व शेगाव यांना प्रथम क्रमांक, संग्रामपूर व लोणार पथकांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच निक्षय मित्रफम्हणून मेहत्रे हॉस्पिटल व लद्धड हॉस्पिटल यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नितीन इंगळे यांनी तर आभार सिद्धेश्वर सोंळकी यांनी मानले.

# बुलडाणा येथे उन्हाळी क्रीडा व व्यक्तिमत्व विकास शिबीराचे आयोजन




**जनसंचलन/ बुलढाणा**

जिल्ह्यातील खेळाडू घडावेत, त्यांच्या कौशल्यांना वाव मिळावा आणि विद्यार्थ्यांमध्ये खेळाविषयी आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलडाणा यांच्या वतीने उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण व व्यक्तिमत्व विकास शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर दि. १ एप्रिल ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणार असून सकाळी ६ ते ८ आणि सायंकाळी ५.३० ते ७.३० या दोन सत्रांमध्ये प्रशिक्षण दिले जाईल. जिल्हा क्रीडा संकुल, जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुल, तालुका क्रीडा संकुल (धाड नाका शेरीवेल) तसेच एडेड हायस्कूलचे मैदान या ठिकाणी शिबीर होणार आहे. शिबीराचा शुभारंभ दि. १ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुल, बुलडाणा येथे होणार आहे. या शिबिरात मैदानी खेळांसह आर्चरी, हँडबॉल, कबड्डी, खो-खो, फुटबॉल, बॉक्सिंग, जिम्नॅस्टिक्स आदी विविध खेळांचे आधुनिक आणि तंत्रशुद्ध प्रशिक्षण दिले जाणार आहे. राज्य क्रीडा मार्गदर्शक, तसेच जिल्ह्यातील आजी-माजी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. ८ ते १७ वयोगटातील विद्यार्थी (मुले व मुली) या शिबिरात सहभागी होऊ शकतात. मात्र ८ ते १४ वयोगटाला प्राधान्य दिले जाणार आहे. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमतेत वाढ होऊन त्यांचे आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होईल. यासोबतच व्यक्तिमत्व विकासासाठी चित्रकला, योगा, एरोबिक्स, लाठी-काठी, क्रीडा दुखापत व प्रथमोपचार, तसेच आहार विषयक मार्गदर्शन तज्ञांकडून दिले जाणार आहे. हे शिबीर पूर्णपणे विनामूल्य असून नियमित उपस्थित राहणाऱ्या खेळाडूंना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. इच्छुकांनी ऑनलाईन नोंदणी करावी तसेच अधिक माहितीसाठी उज्वला लांडगे (मो. ९७६४७३२७६८) व जीवन मोहड (मो. ९४०५७३४४०३) यांच्याशी संपर्क साधावा.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ३५ कोटींच्या मुद्द्यावरून बुलढाण्यात राजकीय भूकंप स्पष्टीकरणानंतरही वाद कायम!

## ३५ कोटींच्या मुद्द्यावर चिखलीच्या आ.महालेंचे इंगळेंचा आ.गायकवाडांना टोला! अन संजूभाऊंच्या खासदारांच्या तिकिटावरच प्रश्न?

**जनसंचलन/बुलढाणा**

चिखली मतदारसंघातील झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमानंतर संजय गायकवाड यांच्या एका वक्तव्याने जिल्ह्याच्या राजकारणात खळबळ उडवली आहे.कार्यकर्त्यांसाठी ३५ कोटी रुपयांचे कमिशन सोडले, असा दावा करत त्यांनी स्वतःच्या त्यागाची भूमिका मांडली; मात्र कमिशन या शब्दामुळे विरोधकांनी मुद्दा उचलत प्रश्नांची सरबत्ती सुरू केली आहे. रविवारी बुलढाण्यातील मातोश्री जनसंपर्क कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात चिखली मतदारसंघातील १८ गावांतील शेकडो कार्यकर्त्यांनी शिंदे गटाच्या शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी बोलताना आ.गायकवाड यांनी कार्यकर्त्यांच्या बळावरच आपली ताकद असल्याचे सांगत, पूर्वी सायकलवर फिरणारे कार्यकर्ते आज फॉर्च्युनरमध्ये फिरतात, असे उदाहरण दिले.मात्र ३५ कोटींच्या उल्लेखानंतर वातावरण तापले. वाद वाढताच गायकवाड यांनी स्पष्टीकरण देत कमिशन नव्हे, कार्यकर्त्यांना ३५ कोटी रुपयांची कामे दिली, असे सांगितले. तरीही या शब्दप्रयोगामुळे राजकीय वर्तुळात संशयाचे वातावरण कायम आहे. दरम्यान, भाषणात त्यांनी मित्रपक्ष भाजपवर थेट हल्ला चढवत कार्यकर्त्यांवर अन्याय केला तर गाठ माझ्याशी आहे,असा इशारा दिला.त्यांच्या आक्रमक शैलीमुळे महायुतीत तणाव उफाळल्याचे चित्र दिसत आहे. विशेष म्हणजे त्यांनी आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विद्यमान खासदार प्रतापराव जाधव यांच्या उमेदवारीवरही अप्रत्यक्ष प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याची चर्चा रंगली आहे. याचबरोबर चिखलीच्या आमदार श्वेता महाले यांनाही अप्रत्यक्ष आव्हान दिल्याचे मानले जात आहे. या सर्व घडामोडींमध्ये महाले यांच्या पीए सुरेश इंगळे यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे नाव न घेता गायकवाडांवर निशाणा साधला. वाचाळ लोक स्वतःच अडचणीत येतात ३५ कोटींचे कमिशन, आणि शाळा शिकणे किती महत्त्वाचे आहे असा टोला त्यांनी लगावला.



एकीकडे गायकवाडांचा आक्रमक पवित्रा, दुसरीकडे भाजप-शिवसेना युतीतील अंतर्गत नाराजी आणि त्यातच स्थानिक नेत्यांचे आरोप-प्रत्यारोप यामुळे बुलढाण्यातील राजकारण तापले आहे.कमिशन या एका शब्दाने पेटलेला हा वाद आता केवळ स्पष्टीकरणाने शांत होईल का, की याचे मोठे राजकीय परिणाम होतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. कार्यकर्त्यांवर अन्याय करणाऱ्यांना थेट इशारा देताना कुणाची माय मी बघतो!त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता आहे.

### खासदारांना काय बोलले?

आमदार संजय गायकवाड यांनी भाषणात पुढील लोकसभा निवडणुकीचा मुद्दा उपस्थित करत, पुढची लोकसभा कोण लढणार, हे सगळ्यांना माहिती आहे,असे सूचक वक्तव्य केले. यामुळे विद्यमान खासदार प्रतापराव जाधव यांच्या उमेदवारीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात जोर धरत आहे.

---

# चिखलीच्या आ.श्वेताताई महाले यांचा आ.संजय गायकवाडांवर पलटवार...

## त्यांची दमदाटी, दादागिरी चालू आहे!आर.टी.आय चा दबाव टाकून पक्षप्रवेश? आ.महालेंचा गंभीर आरोप!





**जनसंचलन/बुलढाणा**

३५ कोटींच्या कथित ङ्कङ्कमिशनफ्फ वक्तव्यावरून जिल्ह्यात उसळलेले राजकारण आता उघड संघर्षात बदलले असून युतीचे बुलडाणा आमदार संजय गायकवाड यांच्या आक्रमक भाषेला चिखलीच्या मित्र पक्ष्याच्या आमदार श्वेता महाले यांनी जोरदार खणखणीत प्रत्युत्तर देत भर उन्हाळ्यात तापमान वाढवले आहे.

चिखली मतदारसंघातील कार्यकर्त्यांच्या पक्षप्रवेशावेळी शिंदे गटाचे आ.गायकवाड यांनी कार्यकर्त्यांसाठी ३५ कोटींचे कमिशन सोडले असा दावा केल्यानंतर विरोधकांनी हाच मुद्दा पकडून त्यांच्यावर हल्लाबोल केला.नंतर गायकवाड यांनी स्पष्टीकरण देत कमिशन नव्हे, कामे दिली असे म्हटले, तरीही संशयाचे ढग कायम आहेत.याच दरम्यान कुणाची माय मी बघतो! असा इशारा देत त्यांनी विरोधकांना थेट आव्हान दिले.

या पार्श्वभूमीवर आमदार श्वेता महाले यांनी संतप्त प्रतिक्रिया देत गायकवाडांच्या कार्यपद्धतीवर गंभीर आरोप केले. ही भाषा सुसंस्कृत नाही. माझ्या मतदारसंघातील सरपंचांना जाणीवपूर्वक आर.टी.आय अर्ज टाकून त्रास दिला जातो. दोन-तीन पत्रे टाकून त्यांना अडचणीत आणले जाते आणि नंतर संजूभाऊंचा निरोप सांगत शिवसेनेत प्रवेश करण्यासाठी दबाव टाकला जातो, असा गंभीर आरोप महाले यांनी मीडिया समोर केला. त्या पुढे म्हणाल्या, ही सरळसरळ दमदाटी आणि दादागिरी आहे. काम सुरळीत करायचे असेल तर पक्षप्रवेश करा, असा दबाव टाकणे लोकशाहीस घातक आहे.महाले यांच्या या वक्तव्यामुळे गायकवाडांवरचा राजकीय दबाव आणखी वाढला आहे. दरम्यान, आमदार महाले यांचे पीए सुरेश इंगळे यांनीही सोशल मीडियावरून वाचाळ लोक व शिक्षणाचा अभाव स्वतःच अडचणीत येतात असा टोला लगावत वादात तेल ओतले आहे. एकीकडे गायकवाडांची आक्रमक शैली, दुसरीकडे महाले यांचे थेट आरोप आणि महायुतीतील अंतर्गत कुरघोडी यामुळे बुलडाणा जिल्ह्यातील राजकारण सध्या अक्षरशः पेटले असून ३५ कोटींचा मुद्दा आता मोठ्या राजकीय भूकंपात रूपांतरित होण्याची चिन्हे दिसत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८